R.G.Patil

ijindex
digital directory of Indian journals

ISSN 2277 - 7539 (Print)
Impact Factor - 5.631 (SJIF)

# Excel's International Journal of Social Science & Humanities

An International Peer Reviewed Journal

January - 2020
Vol. I No. 13

Govt. College of Arts & Science, Aurangabad

EXCEL PUBLICATION HOUSE
AURANGABAD

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

डॉ.बाबासाहेब आंबेडकर : यांचे कार्य
अंबादास शामराव रगडे 93

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्रीय सुरक्षा व परराष्ट्रीय धोरणविशयक विचार
प्रा. डॉ. बी. डी. तोडकर प्रा. रामकिषन आवाड 96

डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय स्त्री
प्रा.रविंद्र गोविंदराव पाटील 99

डॉ बाबासाहेब अंबेडकरांची जलनिती व सिंचन विषयक कार्य
प्रा. डॉ. दत्ता पिलाप्पा हिंगमिरे 102

विषय : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विचारसरणी आणि त्याचा आधुनिक भारतावरील परिणाम
डॉ. बाबासाहेब आंबेडकरोत्तर दलित चळवळ प्रा. राहुल चोखाजी साळवे 106

डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे आर्थिक विचार
प्रा.सचिन रमेश साळवे 109

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीविषयक विचार
प्रा.डॉ.सावंत के.डी. 111

अंबेडकर के सपनों का समाज निर्माण: पंचायती राज व्यवस्था में दलित महिलाओं का प्रतिनिधित्व
स्मिता मुरलीधर भगत 114

स्त्री उद्धाराचे महान पर्व : डॉ. बाबासाहेब आंबेडकर
डॉ. सुवर्णा भाऊसाहेब पाटील 118

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार
प्रा.डॉ. गोपालसिंह बी. बच्छिरे विजय साहेबराव साळवे 121

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सत्याग्रहाच्या मार्गाने मानवाधिकाराची पेरणी
डॉ. गोपालसिंह बछिरे 125

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतष्त्वाखालील दलित चळवळ
प्रा.निल नागभिडे 129

बौध्द धम्म चळवळीत अनागारिक धम्मपाल यांचे योगदान
बाळु साहेबराव हिवाळे 132

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शौक्षणिक विचार
डॉ.गट्टी जी.व्ही. 135

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

Govt. College of Arts & Science Aurangabad

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय स्त्री

प्रा.रविंद्र गोविंदराव पाटील

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भारतीय समाजातील विविध घटकांच्या पुनरुत्थानात सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात अनमोल असे योगदान लाभले आहे. मनुष्याच्या निर्मितीपासून भारतीय समाजातील विविध घटकांवर अन्याय करणारी जुनाट आचार विचारांची हजारो वर्षाची परंपरेवर आधारलेली व विषमतेच्या तत्वावर आधारीत समाजव्यवस्था नष्ट करुन त्याऐवजी समाजातील सर्व घटकांत समता स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या लोकशाहीधिष्ठीत मानवी मुल्यांची प्रतिष्ठापना ठरत नवसमाज निर्माण करण्याचे महान कार्य डॉ.आंबेडकरांनी या देशासाठी केले. या नवसमाजातील "स्त्री" आज २१ व्या शतकात बिनधास्तपणे व स्वतंत्रपणे जीवन जगत आहे. प्राचीन कालखंडानंतर आधुनिक काळात मात्र तिची स्थिती भारतीय संस्कृती आणि समाजामध्ये एका अबलेप्रमाणे होती. या स्त्री जीवनात अमुलाग्र परिवर्तन होण्यास अनेक महापुरुषांचे योगदान कारणीभूत आहे. त्यापैकी महत्वाचे म्हणजे सामाजिक क्रांतीचे अग्रदुत मा.ज्योतीबा फुले आणि त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांचे स्त्री विषयक कार्य होय. यानंतर डॉ.बाबासाहेबांनी आपल्या कृती आणि कार्यात स्त्रीला मानसन्मान मिळवून देण्याचे महत्वपूर्ण योगदान भारतीय स्त्रीयांसाठी दिले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन आणि कार्य संपुर्ण मानवी समाजाला प्रेरणा देणार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय स्त्रीयांसाठी सामाजिक, धार्मिक, आर्थिक आणि शैक्षणीक अशा सर्वच क्षेत्रात महत्वाचे कार्य केले. त्यांनी केवळ बोलक्या सुधारकास प्रमाणे कार्य न करता कृतीशील कार्य केले. भारतीय समाजातील पुरुषप्रधान संस्कृती केवळ भाषणांनी आणि लेखनाने बदलणार नाही यांचा त्यांना विश्वास होता. म्हणूनच त्यांनी स्त्रीयांना सक्षम करण्यासाठी कायद्याची तरतुद केली. त्यांनी केलेल्या स्त्रीविष्ध्यक कार्याचा व त्यांच्या विचारांच्या निवडक बाबीचा अभ्यास आपण या संशोधन पत्रिकेतून करणार आहोत.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री शिक्षण विषयक विचार**

शिक्षणामुळे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होतो. समाजात परीवर्तन घडवून आणावयाचे असल्यास शिक्षणाशिवाय पर्याय नाही. म्हणून डॉ.बाबासाहेबांनी स्त्रीयांचा उद्धार करावयाचा असेल तर शिक्षणाशिवाय होऊ शकणार नाही अशी भूमिका मांडून स्त्री शिक्षणाचा आग्रह धरला. मनुने स्त्रीयांचे अधिकार हिरावून घेतले. स्त्रीयांना नाकारणारी व्यवस्था मनुच्या काळात आली. ही मनुची जुलमी व्यवस्था नाकारुन स्त्रीयांना सन्मानाने जगता यावे अशी व्यवस्था आपल्या विचारांच्या माध्यमातून डॉ.बाबासाहेबांनी प्रस्थापीत केली. डॉ.बाबासाहेबांनी विद्यार्थी दशेत असल्यापासून मुलांप्रमाणे मुलींनीदेखील शिक्षण घेतले पाहिजे असे त्यांना वाटत होते व सर्व क्षेत्रांत पुरुषांच्या बरोबरीने स्त्रीयांनी वावरले पाहिजे, असे त्यांचे विचार होते. स्त्रीयांना शिक्षण तर द्यावे मात्र ते देखील सहशिक्षण द्यावे या मताचे ते होते. स्त्री-पुरुषांना एकच व एकत्र शिक्षण द्यावे या गोपाळ गणेश आगरकर यांच्या मताशी ते सहमत होते. म्हणूनच स्त्रीयांसाठी वेगळया शाळा व महाविद्यालये



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

असावी यास त्यांची सहमती नव्हती. कारण त्यांना स्त्री-पुरुषांच्या एकत्र शिक्षणा बरोबरच स्त्री-पुरुष समानता हे तत्व देखील समाजात रुजवायचे होते.

**हिंदू कोड बील व स्त्री मुक्ती**

प्राचीन (बुध्द)काळातील भारतीय स्त्रीचे सामाजिक व्यवस्थेतील जे सर्वोच्च स्थान होते ते काळानुरुप लुप्त झाले. त्याला सर्वप्रथम धक्के देण्याचे कार्य महात्मा फुलेंनी केले. त्यांनी स्त्रीयांसाठी सर्व प्रथम स्त्रीशिक्षणाचे दरवाजे उघडून दिले. पूढे त्यांच्याच कार्याने प्रेरीत होऊन भारतीय स्त्रीला धर्माच्या परंपारीक चालीरीती तसेच पुरुषत्वाच्या जोखडातून मुक्त करण्याचे कार्य बाबासाहेबांनी हिंदू कोड बीलाच्या रुपाने केले. यातून भारतीय स्त्री खऱ्या अर्थाने

गुलामगिरीच्या बेडयातून मुक्त झाली. डॉ.बाबासाहेबांनी हिंदू कोड बील सादर केल्यानंतर त्याला प्रतिगामी विचारसरणीच्या लोकांनी जोरदार विरोध केला. अर्थातच त्यावर डॉ.बाबासाहेबांच्या पुरागामी विचारांची छाप होती. या बिलासाठी त्यांना आपला मंत्रीमंडळाचा राजीनामा द्यावा लागला. मात्र त्यापुढील काळात हिंदू कोड बील विविध लहान बिलात स्वतंत्रपणे मंजूर झाले. ते बाबासाहेबांचेच यश होते. विविध स्वतंत्र मंजूर झालेल्या बिलातून स्त्रीयांना पुढील प्रमाणे हक्क व अधिकार प्रथमच प्राप्त झाले.

१. स्त्रीला स्वतःहून घटस्फोट घेण्याचा अधिकार
२. नवऱ्याने घटस्फोट दिल्यास किंवा घटस्फोटाशिवाय पतीपासून विभक्त राहील्यास स्त्रीला पुढील जीवन व्यतीत करण्यासाठी पोटगी मिळण्याचा अधिकार.
३. मुलीला वडीलांच्या मिळकतीवर मुलाइतकाच समान हिस्सा मिळविण्याचा अधिकार तसेच मुलीला वडीलांच्या मिळकतीवर वारस होण्याचा आधिकार.
४. स्त्रीयांना स्वतः कमविलेल्या मिळकतीवर अधिकार.
५. स्त्रीयांना मुल दत्तक घेण्याचा अधिकार तसेच मुलांप्रमाणे मुलीला देखील दत्तक जाण्याचा अधिकार.
६. पतीला एक पत्नी असतांना दुसरा विवाह करण्यास बंदी जेणेकरुन स्त्रीयांच्या होणाऱ्या हालअपेष्टा थांबतील.
७. आंतरजातीय विवाह करण्यास मान्यता.
८. स्त्रीला स्वतःचा वारस निश्चित करण्याचा अधिकार.

अशा रितीने भारतीय संविधान व हिंदू कोड बीलाव्दारे डॉ.बाबासाहेबांनी भारतीय समाजातील स्त्रीयांना दिलेली अनमोल देणगी आहे. डॉ.बाबासाहेबांच्या अथक प्रयत्नामुळेच भारतीय स्त्री आज मुक्तीचा व सुटकेचा श्वास घेत आहे. स्त्रीयांच्या अंधकारमय जीवनासाठी डॉ.बाबासाहेब हे खऱ्या अर्थाने दैदिप्यमान सूर्य ठरले.

निष्कर्ष :

१. स्त्री शिक्षणातूनच भारतीय स्त्रीयांची तसेच अस्पृश्य समाजाबरोबरच इतर समाजाची व पर्यायाने देशाची उन्नती होईल. हे डॉ.बाबासाहेबांच्या विचारातून स्पष्ट झाले.
२. डॉ.बाबासाहेबांनी समाजातील सर्वसामान्य स्त्रीयांबरोबरच समाजाने नाकारलेल्या स्त्रीयांना



Govt. College of Arts & Science, Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

मान-सन्मान मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले.

३. डॉ.बाबासाहेबांनी भारतीय समाजातील स्त्रीया आर्थिकदृष्टया सक्षम करण्याच्या कार्यात मोलाचे योगदान दिले.

४. भारतीय समाजातील स्त्रीयांना डॉ.बाबासाहेबांनी संविधानातून कायद्याव्दारे महत्वाचे अधिकार प्राप्त करुन दिले.

**संदर्भ ग्रंथ :**


१) पवार उर्मिला, मून मीनाक्षी, ' आम्हीही इतिहास घडवला', सुगावा प्रकाशन,पुणे-२०००.

२) म.श्री.दिक्षित, 'आंबेडकरांचे विचारधन' , रघुवंशी प्रकाशन,दादर,मुंबई,प्रथमावृत्ती -१९८६.

३) वसंत मून, हरी नरके (संपा.) ' डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड - १८, भाग-१, प्रकाशक समग्र साहित्य वाङःमय लेखन विभाग महाराष्ट्र शासन मुंबई.

४) डॉ.धनराज दहाट,(संपा.)'डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे आणि विचार' संकेत प्रकाशन,नागपूर-२००३.

५) वसंत मुन (संपा.) ' डॉ.आंबेडकर बाबासाहेब यांचे बहिष्कृत भारत आणि मुकनायक', शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन,मुंबई-१९९०.

६) डॉ.पानतावणे गंगाधर, 'पत्रकार-डॉ.बाबासाहेब आंबेडकर', प्रतिभा प्रकाशन,पुणे-१९९६.

७) भारतीय संविधान, महाराष्ट्र शासन,मुंबई-२००७.

८) दैनिक प्रभात, दि.१४ एप्रिल २०१८.


PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad


**प्रा.रविंद्र गोविंदराव पाटील**

सहाय्यक प्राध्यापक,इतिहास, शासकीय ज्ञान-विज्ञान महाविद्यालय, किले-अर्क, औरंगाबाद.